# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.11.2025** **वार:शुक्रवार**

1. अणु क्षेत्र खासगी भागीदारांसाठी खुले करण्याची योजना पंतप्रधानांकडून घोषित, देशातील पहिल्या खासगी तत्वावर विकसित ऑर्बिटल रॉकेटचं उद्घाटन
2. दिव्यांगांच्या विरुद्ध अवमानकारक वक्तव्याबाबत कडक कायदे करण्याची सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला सूचना
3. केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करण्याचे महसूल विभागाचे आदेश आणि
4. खासदार क्रीडा महोत्सवाची पुण्यात सांगता

**अणुऊर्जा**

अणुऊर्जा क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी खुलं करण्याच्या दिशेनं सरकार वाटचाल करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. हैदराबादमधील भारतीय अंतराळ स्टार्टअप स्कायरूटच्या इन्फिनिटी परिसराचं काल दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केल्यानंतर मोदी बोलत होते. सरकारनं खासगी कंपन्यांसाठी अंतराळ क्षेत्र खुलं केलं आहे, त्याचप्रमाणं इतर सुधारणांची व्याप्ती सतत वाढत आहे, भारताचं अंतराळ क्षेत्र जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक ठिकाण बनत आहे असंही त्यांनी नमूद केलं. याप्रसंगी, पंतप्रधानांनी स्कायरूटच्या पहिल्या ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-1 याचं अनावरण केलं. या रॉकेटची उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता आहे.

**दिव्यांग**

अपंगांविरुद्धच्या अपमानास्पद टीकेवर कारवाई करण्यासाठी कडक कायदा करावा असं सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला सांगितलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठानं दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेच्या याचिकेवर सुनावणी करताना ही सूचना केली. खासगी दूरचित्रवाणीवरील एका कार्यक्रमात दिव्यांग सहभागींवर झालेल्या टिकेविरुद्ध ही याचिका दाखल करण्यात आली होती. एससी-एसटी कायद्याच्या धर्तीवर अपंग व्यक्ती आणि दुर्मिळ अनुवांशिक विकारांबाबत होणारी अपमानास्पद टीका, दंडनीय गुन्हा ठरवण्यासाठी कायदा तयार करण्याची आवश्यकता असल्याचं न्यायालयानं सांगितलं. त्याचप्रमाण ऑनलाइन मंचांवरील अश्लील, आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर सामग्रीचं नियमन करण्यासाठी तटस्थ, स्वतंत्र आणि स्वायत्त संस्थेची आवश्यकता असल्याचं मतंही सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या बाजूनं माहिती देताना सांगितलं की यासंदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वं तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**जन्म-मृत्यू दाखले**

बेकायदा पद्धतीनं तसंच खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळवलेले अथवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करून, यासंबंधांत तातडीनं पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले आहेत. याबाबत शासकीय परिपत्रक महसूल विभागानं काल प्रकाशित केलं. सर्व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना सोळा मुद्यांच्या आधारे जन्म-मृत्यू दाखल्याची तपासणी करावी असे निर्देश त्यात देण्यात आले आहेत. नव्या निर्देशांनुसार, आधार कार्ड हा जन्माचा किंवा जन्म ठिकाणाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही; तसंच अर्जातील माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

**मतदारयादी चुकादुरुस्ती**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादीतील चुका तातडीनं दुरुस्त करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी सर्व सहायक आयुक्तांना दिले आहेत. अनेक मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याची तक्रार होत असून, राज्य निवडणूक आयोगानंही स्वतःहून दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले आहेत.

**नवदाम्पत्य जनजागृती**

राज्यातल्या नगरपालिका आणि नगरपंचयातींच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांचे नेते ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल लातूर आणि हिंगोली जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. उदगीर इथं झालेल्या सभेत त्यांनी, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या 'लखपति दीदी' उपक्रमाला मोठी गती देण्याची घोषणा केली. तर लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असून, महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी हिंगोली इथल्या प्रचारसभेत बोलताना केला.

दरम्यान मतदान जनजागृती करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेबरोबरच अनेक सामान्य नागरिकही पुढाकार घेत आहेत. नवजीवनाला सुरुवात करतानाच मतदान जनजागृतीचं कर्तव्य जपणारं नवदाम्पत्य परभणी जिल्ह्यातील गंगाखेडमध्ये चर्चेचा विषय ठरलं आहे. ऐकूया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून...

**परभणी जिल्ह्यात सात नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीसाठी निवडणूक होत असून यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने यासाठी स्वीप च्या माध्यमातून नागरिकांमध्ये विविध प्रकारे जनजागृती केली जात असून, यामध्ये गंगाखेड शहरात राहणारे अभिजीत तामखाने आणि वैष्णवी तामखाने जैदापुरा या नव दांपत्य मतदान जनजागृतीमध्ये सहभागी झाले. ईएम वर मतदान करत या नववधू आणि वराने अफवा टाळा प्रक्रियेवर विश्वास ठेवा आणि मतदान जरूर करा, असा संदेश नागरिकांना देत लोकशाहीला बळकट करण्यासाठी लोकशाही प्रक्रियेबद्दलची सामाजिक बांधिलकी जपत मतदान करण्याचा संदेश नागरिकांना दिला. आकाशवाणी बातम्यांसाठी सुदर्शन चापके परभणी.**

**शरद पवार**

महायुतीतल्या तिन्ही पक्षांमध्ये निधी देण्यावरून चढाओढ लागली आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. ते बारामती इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**फुले पुण्यतिथी**

थोर समाजसेवक महात्मा ज्योतिराव फुले यांची आज पुण्यतिथि आहे. या निमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**खासदार क्रीडा महोत्सव**

पुण्यामध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवाची काल सांगता झाली. केंद्रीय विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारानं हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. विविध प्रकारच्या पस्तीस क्रीडा प्रकारांचा समावेश असलेल्या या क्रीडा महोत्सवात सुमारे 44 हजार खेळाडूंनी सहभाग नोंदवला. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचं प्रतिनिधित्व करणारे बॉक्सर मनोज पिंगळे, नेमबाज अंजली भागवत, टेनिसपटू नितीन कीर्तने यावेळी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याचं नाव नेणाऱ्या क्रीडापटूंचा तसंच पंधरा क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा यावेळी, अभिनेते अक्षय कुमार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना मुरलीधर मोहोळ म्हणाले....

**हे इतकं मोठं क्रीडा वैभव या देशाचं आहे, आपल्या शहराचं आहे, ते समृद्ध करणं आणि ते अधिक चांगल्या पद्धतीनं आपल्याला वाढवता कसं येईल हाही या स्पर्धेच्या आयोजनाच्या मागचा उद्देश होता. आणि त्यामुळे पुढच्या काळात स्टेट असेल, नॅशनल असेल, इंटरनॅशनल असेल या स्पर्धांमध्ये खेळताना सुद्धा एक चांगलं व्यासपीठ यानिमित्तानं उपलब्ध झालं नाही याच्यातून काही खेळाडू हे निश्चित पुढच्या, या काळामध्ये घडणार आहे भविष्याच्या दृष्टीनं या पुण्याचं नाव पुढच्या काळामध्ये अधिक मोठं करण्याच्या दृष्टीनं या क्रीडा क्षेत्रात आज एक संधी प्राप्त करून देण्याचा आमचा हा प्रयत्न होता. पुढच्या काळात ही स्पर्धा ही दरवर्षी होणार आहे त्याच्यात अधिकपणे सुसूत्रता आणण्याचं काम आपण करू अधिक चांगल्या प्रकारे अधिक जास्त संख्येने खेळाडू याच्यात कसे सहभागी होतील अधिक खेळ प्रकार कसे सहभागी होतील याचाही विचार पुढच्या काळात करू.**

**<u>पुणे-नदी-महोत्सव</u>**

नोव्हेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा हा 'नदी सप्ताह' अर्थात रिव्हर वीक म्हणून साजरा केला जातो. तसंच, 2 डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस' म्हणूनही साजरा करण्यात येतो. याच औचित्यानं पुण्यात 'नदी महोत्सव-स्वच्छ नदी, सुंदर पुणे!' आयोजित करण्यात आला आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**यत्र जलम् तत्र जीवनम्। कधीकाळी पुण्याच्या हृदयातून शांतपणे वाहणारी...आपली मुठा नदी.**
**शहराच्या संस्कृतीची साक्षीदार... आणि आपल्या प्रत्येकाच्या आठवणींचा एक अमूल्य ठेवा. पण.. आज... तीच नदी आपल्याकडे स्वच्छतेची साद घालत आहे. याच औचित्याने पुणे महानगरपालिका आणि इतर स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने मुठा नदीपात्राची स्वच्छता करण्यासाठी 'नदी महोत्सव-स्वच्छ नदी, सुंदर पुणे!' आयोजित करण्यात आला आहे. येत्या रविवारी, 30 नोव्हेंबरला सकाळी 7 ते 10 या वेळेत, भिडे पूल ते म्हात्रे पूलाचा हा संपूर्ण नदीपट्टा जागरूकतेने गजबजणार आहे. हातात हातमोजे, चेहऱ्यावर मास्क, आणि मनात पुण्याला स्वच्छ करण्याचा निर्धार करत, नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवक सगळे मिळून करणार आहेत नदी स्वच्छता. नदीचं महत्त्व प्रत्येकापर्यंत पोचवण्यासाठी पथनाट्य, ड्रम सर्कल्स आणि पर्यावरण जनजागृतीचे अनेकविध उपक्रम यावेळी राबवण्यात येणार आहेत. चला तर मग.. येत्या रविवारी श्रमदान करून, आपल्या मुठा नदीला पुन्हा एकदा स्वच्छ, सुंदर आणि जिवंत बनवूया. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, पुण्याहून सविता म्हसकर.**

**<u>शिवप्रतापदिन-सातारा</u>**

सातारा जिल्ह्यातील प्रतापगडावर काल शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली तसंच छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवलेल्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र सूर्यप्रकाशयुक्त कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.